ऐक्य

# सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत रहिमतपूर येथे सायबर जनजागृती

**रहिमतपूर,** दि. २७ : वर्ये येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थीनी प्रणाली पवार व श्रेया शेडगे यांनी रहिमतपूर येथील डॉ. काकासाहेब परांजपे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, आर्टस्, कॉमर्स , रहिमतपूर येथे विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे कसे होतात. तसेच तसे झाल्यास आपण काय केले पाहिजेल याचे धडे दिले.

वेगवेगळ्या सायबर गुन्ह्याची माहिती करून देणे तसेच त्या गुन्ह्यापासून कसे सुरक्षित राहिले पाहिजे याची माहिती देण्यासाठी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पा अंतर्गत जनजागृती करत लोकांना मदत केली जात आहे. यावेळी विद्यार्थ्यांना फायनान्शिअल फ्रॉड, सोशल मीडिया फ्रॉड या सगळ्या गोष्टी समजून सांगण्यात आल्या आणि यावर सायबर गुन्हा घडल्यावर आपण कुठे रिपोर्ट करावे यांचीही माहिती विद्यार्थी व शिक्षकांना देण्यात आली.


सायबर जनजागृतीबाबत मार्गदर्शन करताना प्रणाली पवार.

यावेळी डॉ. काकासाहेब परांजपे विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य पी. पी. वावरे, उपमुख्याध्यापक टी. व्ही. भोसले, सूर्यकांत कर्णे व माने सर यांच्या पुढाकारामुळे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

या उपक्रमासाठी संस्थेचे संचालक डॉ. बी. एस सावंत यांनी विशेष पुढाकार घेतला आणि महत्वपूर्ण सहकार्य दिले त्यांच्या मार्गदर्शनामुळे हा उपक्रम प्रभावी पणे राबवता आला . कंप्युटर विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि पी.ए. लोखंडे यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरु आहे.